# नियमित दिवाणी दावा क्र. २७/२०१६ निशाणी क्र. ५२ वरील आदेश

**प्रकाश सुहास घरत**

**विरुध्द**

**रविंद्र गोविंद घरत.**

१. वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ऑर्डर ६ रूल १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की,

सदरचा दावा हा दावा मिळकतीचे सरनिरस वाटपाकरीता व दावा मिळकतीमधील वादी यांच्या हिश्याचे क्षेत्राचा ताबा कब्जा स्वतंत्र करून मिळकणेकरीता व अनुषंगिक मागण्यांकरीता दाखल केलेला आहे. वादी कथन करीतो की, प्रतिवादी यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेली असुन ते न्यायालयात हजर आहेत. व त्यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. परंतु दरम्यानच्या काळात वादीला सिडको कार्यालयामधुन अशी माहिती मिळाली की, दावा मिळकतीबाबत तसेच संपादीत मिळकती मोबदल्यात, विकसित भूखंड वाटप करण्याचे, इरादापत्र जाहीर करण्याचे, भूखंडाचे ॲलॉटमेंट देण्याचे व भूखंडाचे लिज ॲग्रीमेंट करून भूखंड हस्तांतरीत करण्याचे अगर बांधकामाबाबतचे सर्व अधिकार मे.वसाहत अधिकारी प्रशासकीय कार्यालय जे.एन.पी.टी.ता.उरण यांचे कार्यालयास प्रदान करण्यांत आलेले आहेत.

३. वादीने दावा मिळकतीत इतर कोणाही व्यक्तिचे नावे अथवा व्यापारी प्रयोजनाकरीता व बांधकामा प्रयोजनाकरीता देवु नये अशा आशयाची नोटीस दिनांक २०/०७/२०१७ रोजी मे.वसाहत अधिकारी ता.उरण यांना दिली आहे. वादी असे कथन करीतो की, अशा परीस्थीतीत मे.वसाहत अधिकारी प्रशासकीय कार्यालय शासकीय इमारत जे.एन.पी.टी.न्हावा शेवा यांना प्रस्तुत दाव्याचे कामी सामील करणे हे कायदेशीर न्यायनिर्णय होण्याकरीता अत्यंत आवश्यक आहे. त्यांना दाव्याकामी सामील न केल्यास वादीचे कधीही न भरून येणारे अपरिमित नुकसान होईल.

४ .सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी जोरदार हरकत घेवुन असे कथन केले आहे की, दावा मिळकतीचे सर्व अधिकार हे मे.वसाहत अधिकारी यांना असल्याबाबतचे कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने सदर अर्जाच्या कामी दाखल

केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा नाकारण्यांत यावा. प्रतिवादी क्र. ७ ते ११ यांनी सदर अर्जाकामी जोरदार हरकत घेतली असुन वादीने प्रस्तावित प्रतिवादीला दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे नोटीस पाठविणे क्रमप्राप्त होते. परंतु वादीने सदरची नोटीस पाठविली नसल्याने त्यांचा अर्ज फेटाळण्यांत यावा.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. शैलेश नाईक व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.बिराजदार यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता असे निर्दशनास येते की, वादीने सदरचा अर्ज हा दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याच्या अनुषंघाने दखल केलेला आहे. तत्पुर्वी हे कथन करणे न्याय उचित होईल की निशाणी ५० कडील दि.प्र.सं.ऑ.१ रूल १० नुसार वादीने केलेला अर्ज या न्यायालयाने मंजुर केलेला आहे. अर्जाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, सदर अर्जात नमुद केलेल्या दुरूस्ती हया निशाणी ५० कडील अर्जाशी सुसंगत आहेत. व त्या अनुषंघाने वादीने सदरचा अर्ज केलेला आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे मुलभुत स्वरूप बदलत नाही. तसेच प्रतिवादी यांचे कोणतेही स्वरूपाचे नुकसान होणार नाही. परंतु सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. सबब सदरचा अर्ज न्यायदृष्टीकोनातुन मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

२. वादीने सुचविलेल्या दुरूस्त्या या पुढील तारखेपर्यंत करावयाच्या आहेत. व त्या अनुषंघाने दुरूस्ती प्रत त्वरीत दाखल करावयाची आहे.

३. वादीने खर्चाची रक्कम रूपये २०००/- विधी व सेवा विभाग, ता. उरण यांना दयावयाची आहे.

उरण ( आर.बी.पोळ)
दिनांक १६/०१/२०२० सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर उरण.